आरोग्य परिमंडळ नागपूर अंतर्गत १६ क्षकिरण तंत्रज्ञ व १३ प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या सेवा दिनांक ०८.०३.१९९९ पासून नियमित करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः याचिका २०१७/ प्र.क्र.३११/ सेवा ५

१०वा मजला, बी विंग, गो. ते. रुग्णालय संकूल इमारत,
नविन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: १६ सप्टेंबर २०१९

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक सेवानि/२०१३/तंत्रज्ञ/प्र.क्र. ३४३/सेवा ५ दिनांक ३०.०३.२०१६

२) मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी मुळ अर्ज क्रमांक २८४/२०१६ मध्ये दिनांक १०.०३.२०१७ रोजी दिलेला न्यायनिर्णय तसेच मुळ अर्ज क्रमांक ११९ व १२० / २०१४ मध्ये दिनांक ०२.०८.२०१८ रोजी दिलेला न्यायनिर्णय तसेच मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्रमांक ६०६/२०१७ मध्ये दिनांक १२.०९.२०१८ रोजी दिलेला न्यायनिर्णय

प्रस्तावना :

सन १९८८-८९ मध्ये उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर अंतर्गत क्ष किरण तंत्रज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाकरिता प्रादेशिक निवड मंडळाकडून उमेदवार उपलब्ध न झाल्याने सेवा योजन कार्यालयामार्फत विहीत पात्रता व शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या १६ क्ष किरण तंत्रज्ञ व १३ प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना तात्पूरत्या स्वरुपात नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. दरम्यान प्रादेशिक निवड मंडळाकडे मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तात्कालीन परिस्थितीत प्रादेशिक निवड मंडळामार्फत या पदांसाठी उमेदवार उपलब्ध न झाल्याने या कालावधीत नव्याने निर्माण केलेल्या कुटीर रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये व सामान्य रुग्णालयात सदर रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक असल्याने व रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव या नियुक्त्या पुढे चालू ठेवण्यात आल्या. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०८.०३.१९९९ नुसार विविध प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील ३७६१ कर्मचाऱ्यांच्या अनियमित नियुक्त्या नियमित करण्यात आल्या. त्यावेळी सदर १६ क्ष किरण तंत्रज्ञ व १३ प्रयोगशाळा तंत्रज्ञ सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील विहीत तरतूदीनुसार

सेवानियमनासाठी पात्र होते. तथापि, काही कारणास्तव त्यांचे प्रस्ताव विहीत कालावधीत क्षेत्रीय कार्यालयाकडून विभागाला प्राप्त न झाल्यामुळे शासन निर्णय दिनांक ०८.०३.१९९९ नुसार या कर्मचाऱ्यांच्या सेवा तात्कालीन परिस्थितीत नियमित होऊ शकल्या नाहीत. सबब या कर्मचाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णयानुसार दिनांक ०८.०३.१९९९ पासून नियमित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या कर्मचाऱ्यांच्या सेवा वाचा क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार नियमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयात या सेवा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून नियमित करण्यात येतील असे नमूद झाल्याने या कर्मचाऱ्यांच्या सेवा दिनांक ३०.०३.२०१६ पासून नियमित करण्यात आल्या. या कर्मचाऱ्यांपैकी श्री विजय बानुबाकडे हे दिनांक ३०.०३.२०१६ पुर्वी सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांचे नांव या शासन निर्णयात अंतर्भूत नव्हते. त्यामुळे श्री बानुबाकडे यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज क्रमांक २८४/२०१६ दाखल केला होता. या मुळ अर्जावर मा. न्यायाधिकरणाने दिनांक १०.०३.२०१७ रोजी अंतिम निर्णय पारीत केला आहे. या न्यायनिर्णयानुसार श्री बानुबाकडे हे दिनांक ३१.०५.२०१४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असले तरी शासन निर्णय दिनांक ३०.०३.२०१६ मधील सहपत्रात नमूद केलेल्या इतर २८ कर्मचाऱ्यांना जे सेवा विषयक फायदे अनुज्ञेय होतील ते सर्व फायदे श्री बानुबाकडे यांना देण्यात यावेत असे न्यायाधिकरणाने निर्देशित केले आहे. श्री किशोर कोटंबकर व श्री विजय बाभूळकर यांनी त्यांच्या सेवा मुळ दिनांकापासून नियमित करण्याबाबत मुळ अर्ज क्र ११९/२०१४ व १२०/२०१४ तसेच श्री रामटेके व इतर १२ कर्मचारी यांनी मुळ अर्ज क्रमांक ६०६/२०१७ दाखल केला. तसेच या प्रकरणी श्री गवते व इतर यांनी मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे आश्वासित प्रगती योजना व इतर सेवा विषयक लाभ मिळण्याबाबत याचिका क्र ९/२०१२ दाखल केली. या सर्व न्यायालयीन प्रकरणांमध्ये अंतीम आदेश पारीत झालेले आहेत व सर्व न्यायनिर्णय हे कर्मचाऱ्यांच्या बाजूने लागलेले आहेत. या न्यायनिर्णयांच्या अनुपालनास्तव या शासन निर्णयातील सहपत्रात नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमन हे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०८.०३.१९९९ च्या शासन निर्णयातील विहीत अटी व शर्तींची पुर्तता सदर कर्मचारी करीत असल्याने त्या दिनांकापासून नियमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

उपरोक्त अनुषंगाने निर्गमित केलेला वाचा क्रमांक १ मधील शासन निर्णय या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे व सदर शासन निर्णय आता या शासन निर्णयानुसार दिनांक ०८.०३.१९९९ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

१) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट " अ " मध्ये नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा दिनांक ०८.०३.१९९९ पासून नियमित करण्यात येत आहेत. तसेच त्याच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून अखंडीत सेवा हया सेवा विषयक सर्व प्रयोजनार्थ (आश्वासित प्रगती योजना व

सेवा निवृत्ती वेतनासह) ग्राह्य धरण्यात येऊन त्यांना त्यानुसार आर्थिक लाभ अनुज्ञेय राहतील.

२) श्री विजय बानुबाकडे यांचे नांव दिनांक ३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयात ते सेवानिवृत्त झाल्यामुळे अंतर्भूत झाले नव्हते. तथापि, न्यायनिर्णयानुसार त्यांच्या सेवा दिनांक ०८.०३.१९९९ पासून नियमित करण्यात येऊन त्यांना सर्व सेवा विषयक व आर्थिक लाभ (आश्वासित प्रगती योजना व सेवा निवृत्ती वेतनासह) मुळ नियुक्ती दिनांकापासून अखंडीत सेवेसह अनुज्ञेय करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३२२३४१५३७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b17094004b015083dae757656e5d24847898197ddd6b0366a9177f097ed0887a, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=b4e19876ab3eec36e3a3b988441648ab87470cdfe66b14cfbe7ac9bd770485c1, ou=PUBLIC HEALTH DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2019.09.17 12:39:14 +05'30'

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, पुणे
३. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरो व जलजन्य रोग) पुणे
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर
६. जिल्हा शल्यचिकित्सक, नागपूर
७. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
९. मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
११.निवड नस्ती-सेवा-५

परिशिष्ट-अ

अ.क्र.	उमेदवारांचे नांव	पदनाम	जन्मदिनांक	नियुक्तीचा दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक
१	श्री. विनोद रामभाऊ पुनवटकर	क्ष किरण तंत्रज्ञ	०७.०८.१९६४	२१.११.१९८८	३१.०८.२०२२
२	श्री.सागर अंबर सोनावणे	क्ष किरण तंत्रज्ञ	२६.०८.१९६१	२१.११.१९८८	३१.०८.२०१९
३	श्री.देवानंद गोविंदराव थुल	क्ष किरण तंत्रज्ञ	३०.०९.१९६०	२१.११.१९८८	३०.०९.२०१८
४	श्री. उमेश मारोतराव शिवरकर	क्ष किरण तंत्रज्ञ	३०.०३.१९६३	२१.११.१९८८	३१.०३.२०२१
५	श्री. दिलीप वासुदेव तामगाडगे	क्ष किरण तंत्रज्ञ	१०.०७.१९६२	२१.११.१९८८	३१.०७.२०२०
६	श्री. अशोक मारोतराव लांबट	क्ष किरण तंत्रज्ञ	१३.०८.१९६१	२१.११.१९८८	३१.०८.२०१९
७	श्री. प्रमोद विश्वेश्वर वानखेडे	क्ष किरण तंत्रज्ञ	०१.०६.१९६३	२४.११.१९८८	३१.०५.२०२१
८	श्री. विजय लक्ष्मणराव ढोमणे	क्ष किरण तंत्रज्ञ	२३.०९.१९६२	२४.११.१९८८	३०.०९.२०२०
९	श्री. देवेन्द्र लक्ष्मणराव फुलारे	क्ष किरण तंत्रज्ञ	०५.०२.१९६५	२५.११.१९८८	२८.०२.२०२३
१०	श्री.प्रकाश शामराव गवते	क्ष किरण तंत्रज्ञ	१०.०८.१९६३	२५.११.१९८८	३१.१०.२०२१
११	श्री.रवि पांडुरंग पाटील	क्ष किरण तंत्रज्ञ	०१.०७.१९६०	२८.११.१९८८	३०.०६.२०१८
१२	श्री. मनोहर नथ्थुजी वंजारी	क्ष किरण तंत्रज्ञ	१६.११.१९५८	०१.१२.१९८८	३०.११.२०१६
१३	श्री.प्रकाश पांडुरंग भुजाडे	क्ष किरण तंत्रज्ञ	०६.१०.१९६४	०१.११.८८	३१.१०.२०२२
१४	श्री.प्रकाश बापुराव कहारे	क्ष किरण तंत्रज्ञ	०३.०५.१९६१	१३.१२.१९८९	३१.०५.२०१९
१५	श्री.अवचित पांडुरंग धवने	क्ष किरण तंत्रज्ञ	१०.०२.१९६१	१७.०२.१९८९	२८.०२.२०१९
१६	श्री. मोरेश्वर बालाजी कोडलकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०१.०७.१९५९	२१.११.१९८८	३०.०६.२०१७

१७	श्री. किशोर माधवराव कोटंबकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	२८.०८.१९६७	३१.११.१९८८	३१.०८.२०२५
१८	श्रीमती कल्पना प्रेमचंद गुंडरे (गायकवाड)	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	२६.०८.१९६२	२१.११.१९८८	३१.०८.२०२०
१९	श्री.गजानन मारोतराव बेलसरे	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	१५.१२.१९५९	२४.११.१९८८	३१.१२.२०१७
२०	कु.प्रज्ञा सुखदेव अंधारे	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०४.०३.१९६०	२१.११.१९८८	३१.०३.२०१८
२१	श्रीमती विणा मुरलीधर वैद्य (बोबडे)	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	११.०२.१९६४	२५.११.१९८८	२८.०२.२०२२
२२	श्रीमती वसुधा अवधानी (अयाचित)	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	१०.०७.१९६२	१९.१२.१९८८	३१.०७.२०१८
२३	श्री. प्रकाश पंढरीनाथ रामटेके	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०१.०७.१९५८	१६.०२.१९८९	३०.०६.२०१६
२४	श्री. विलास सदाशिव पत्तीवार	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०१.०७.१९६१	०१.०८.१९८९	३०.०६.२०१९
२५	श्री. आशा पशुपतीराम शर्मा (धारणवार)	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०६.०६.१९६३	२७.०७.१९८९	३०.०६.२०२१
२६	श्री. विजय गणपत गजभिये	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०१.०६.१९५९	३१.०७.१९८९	३१.०५.२०१७
२७	श्री.पु.वि. दांडेकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	१२.०९.१९६२	२१.०२.१९९०	३०.०६.२०२०
२८	श्री. विजय नारायण बाभुळकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०२.०१.१९६४	१९.०७.१९९०	३१.०१.२०२२
२९	श्री. विजय बबनराव बानुबाकडे	क्ष किरण तंत्रज्ञ	०१.०६.१९५६	२२.११.१९८८	३१.०५.२०१४

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b17094004b015083dae757656e5d24847898197ddd6b0366a9177f097ed0887a, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=b4e19876ab3eec36e3a3b988441648ab87470cdfe66b14cfbe7ac9bd770485c1, ou=PUBLIC HEALTH DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2019.09.17 12:40:05 +05'30'

(अर्चना वालझाडे)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन